महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१

Email Id - bccellnashik@gmail.com Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

**********************************************************************

जा.क्र. /२०२३

**क्र .मावक/कार्या-१८/कावि-२/एसआर/१३/२०२३**
**दिनांक :- १३ /०१/२०२३** ०६

प्रति,
सहायक कुलसचिव,
कवयत्री बहिनाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

**विषय :- नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय करगांव ता.चाळीसगांव, जि.जळगाव** या कार्यालयाची बिंदुनामावली नोंदवही तपासणीबाबत.

**संदर्भ:-** विषयांकित कार्यालयाकडील **यांचेकडील २५३९/२०२२ दि.१५.११.२०२२ प्राप्त दि.०६.०१.२०२३**

उपरोक्त विषयांकीत कार्यालयाने / संस्थेने खालील पदाची बिंदू नामावली नोंदवही तपासणीसाठी प्रस्ताव दिनांक ०६.०१.२०२३ रोजी या कार्यालयात सादर केलेला आहे.

**प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब(ए), दिनांक ०६/०७/२०२१** अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटीशन क्रं.३१२३/२०२० मध्ये दि.०५/०५/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी दिनांक ०४/०७/२०१९ च्या शासन निणयान्वये विहीत करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास स्थगिती दिल्याच्या दिनांकापासुन म्हणजेच दि.०९/०७/२०२० पासुन शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहीत करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रं.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१५३-१६ब, दिनांक ०३.०१.२०२२** नुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या नाशिक, धुळे, नंदुरबार या आदिवासी बहुल जिल्हयातील जिल्हास्तरीय गट क व गट ड मधील पदे सरळसेवेने भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहीत करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब, दिनांक २५.०२.२०२२** अन्वये बिगर आदिवासी व आदिवासी बहुल जिल्हयाकरीता छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.-२०१४/प्र.क्र.२१३A/१४/१६-ब दि. ०५ मार्च, २०१५ व २६ जून, २०१५ व शासन पत्र दि. २२ ऑगस्ट २०१७** अन्वये अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेली पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारामधुन मा.राज्यपाल यांच्या अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुन भरावयाचे आहे. तसेच शासन निर्णय दि.०५ मार्च २०१५ मधील मुद्दा क्र.९ व अवर सचिव महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र./३२६अ/१६-ब दि.२२ ऑगस्ट २०१७ अन्वये अनुसूचित क्षेत्राबाहेर अनुसूचित जमातीसाठी ७% आरक्षण लागु करण्यात आले आहे.

विषयांकीत कार्यालयाच्या / संस्थेच्या खालील पदासाठी बिंदुनामावली **शासन निर्णय दिनांक ०५.०३.२०१५, २६.०६.२०१५, ०६.०७.२०२१, ०३.०१.२०२२, २५.०२.२०२२ व शासन पत्र दिनांक, २२.०८.२०१७** नुसार खालीलप्रमाणे बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात येत आहे.

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय करगांव ता.चाळीसगांव, जि.जळगाव या कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरून व सहायक कुलसचिव, कवयत्री बहिनाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव त्यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीस अनुसरून खालीलप्रमाणे बिंदु नामावली नोंदवही तपासणी करण्यात येत आहे.

१) पदाचे नांव :- प्राचार्य ( सरळसेवा १००%)
मंजुर पदे :- ०१ कार्यरत पदे :- ०० रिक्त पदे :- ०१

अ.क्र. ०१ संवर्गात एकाकी पद मंजुर असल्याने शासन सा.प्र.वि. निर्णय क्र.बीसीसी १०९७/ प्र.क्र. २०/९७/१६ब दि.२१.०९.९८ नुसार एकाकी पदास आरक्षण लागु नाही.

०२) पदाचे नाव - सहाय्यक प्राध्यापक (पॅडॉगॉजी इन एज्युकेशन) (एकुण मंजुर पदे- ०४) सरळसेवा भरतीचे प्रमाण - १०० %

एकुण मंजुर पदे :- ०४ कार्यरत पदे :- ०२ रिक्त पदे :- ०२

| अ. क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | इमाव | भजक | भजड | विमाप्र | आदुघ + खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुर पदे | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०४ |
| २ | कार्यरत पदे | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ |
| ३ | रिक्त पदे | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |

०४ पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे - ०१ ले पद अजा / अज आळीपाळीने, ०२ रे पद बिंदुनामालवलीच्या क्रमानुसार विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुघ, भजड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने
कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार खुला प्रवर्गात ०२ असे पद भरलेले आहे.

पहिले भरती वर्ष
(दिनांक ०१.०१.२०२२ ते दिनांक ३१.१२.२०२२)
महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन शुध्दीपत्रक दिनांक १८.०२.२०१९ नुसार

| पहिल्या भरती वर्षात एकुण भरावयाची पदे | आदुघ (ईडब्ल्युएस) करीता पहिल्या भरती वर्षात एकुण भरावयाच्या पदांच्या १० टक्केवारीनुसार येणारी पदे | भरती प्रक्रियेअंती आदुघ (ईडब्ल्युएस) वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| ०२ | ०२ X १० = ०.२०<br>पुर्णांकात ०० पदे | ०० |

<u>पहिल्या भरती वर्षात भरावयाची पदे खालील प्रमाणे</u>

| अ.क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एकुण भरावयाची पदे | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |

टीप :- कार्यालयात उपरोक्त संवर्गातील एकुण ०१ मागासवर्गीय कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी ०१ मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com
Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

०३) पदाचे नाव - सहाय्यक प्राध्यापक (प्रिस्पेक्टीव्ह इन एज्युकेशन) (एकुण मंजुर पदे- ०२) सरळसेवा भरतीचे प्रमाण - १०० %

एकुण मंजुर पदे :- ०२ कार्यरत पदे :- ०१ रिक्त पदे :- ०१

| अ. क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आदुघ + खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुर पदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| २ | कार्यरत पदे | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | रिक्त पदे | ०१ | -०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |

०२ पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे - प्रथम अजा त्यानंतर बिंदुनामावलीच्या क्रमानुसार अज, विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुघ, भजड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने

कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार अ.ज. प्रवर्गात ०१ पद कार्यरत आहे. सदरचे पद अतिरिक्त आहे.

कार्यालयाने अ.ज. ०१ पद अतिरिक्त भरलेले आहे. सदरची पदे ही खुले ०१ या रिक्त पदात समायोजित केल्याने (महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील क्रमांक-बीसीसी/२००९/प्र.क्र.३३५/१६-ब दिनांक ०६.०४.२००९ नुसार) खुले या प्रवर्गात पद रिक्त राहणार नाही. तसेच अ.ज. या प्रवर्गात पद अतिरिक्त दिसणार नाही.

**पहिले भरती वर्ष**

**(दिनांक ०१.०१.२०२२ ते दिनांक ३१.१२.२०२२)**

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन शुध्दीपत्रक दिनांक १८.०२.२०१९ नुसार**

| पहिल्या भरती वर्षात एकुण भरावयाची पदे | आदुघ (ईडब्ल्युएस) करीता पहिल्या भरती वर्षात एकुण भरावयाच्या पदांच्या १० टक्केवारीनुसार येणारी पदे | भरती प्रक्रियेअंती आदुघ (ईडब्ल्युएस) वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| ०१ | ०१ X १० = ०.१०<br>पुर्णांकात ०० पदे | ०० |

**पहिल्या भरती वर्षात भरावयाची पदे खालील प्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एकुण भरावयाची पदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |

**अटी**

१. सरळसेवा भरती करतांना समांतर आरक्षण विचारात घ्यावे.
२. मागासवर्गीय अनुशेष प्राधान्याने भरावा.
३. सर्व मागासवर्गीय कर्मचा-यांचे जातप्रमाणपत्र व जातवैधताप्रमाणपत्र प्राप्त करुन दप्तरी ठेवावे.
४. **सदर बिंदूनामावली नोंदवही नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय करगांव ता.चाळीसगांव, जि.जळगाव यांचेकडील जा.क्र. २५३९/२०२२ दि.१५.११.२०२२ रोजीचे प्रमाणपत्रास अधिन राहुन प्रमाणीत करण्यात येत आहे. बिंदू नामावली नोंदवहीबाबत काही न्यायालयीन तक्रारी उद्‌भवल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.**

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com
Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

५. शा.नि.क्र.बीसीसी -२०१२/प्र.क्र.३३१/१२ /१६ब दि.१८.०५.१३ अन्वये सेवेत असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांपैकी ज्यांनी अद्याप जातवैधता तपासण्यासाठी जातपडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही. अशा कर्मचा-यांबाबतीत प्रस्तुत शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

६. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांच्या आधारे दि.१५.०६.१९९५ पुर्वी नौकरीस लागलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर जे त्या मागासवर्गीय प्रवर्गाचे आहेत. त्या मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नाही. अशा कर्मचा-यांच्या बाबतीत शासन निर्णय क्रं.बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३१/१२/१६-ब, दि.१८/०५/२०१३ मधील अ.क्र.०५ व ०६ नुसार कार्यवाही करावी.

७. शासन निर्णय क्रं.बीसीसी-२०१५/प्र.क्र.२७६A/१४/१६-ब, दि.२१/१०/२०१५ अन्वये दि.१५/०६/१९९५ नंतर दि.१७/१०/२००१ पर्यंत या कालावधीत अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्रांच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अदयापपर्यंत सादर केलेले नाही, अशा कर्मचा-यांचे बाबतीत प्रस्तुत शासन निर्णयान्वये कार्यवाही करावी.

८. मागासवर्गीय कर्मचा-यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास अशा कर्मचा-यांबाबतीत शासन निर्णय दिनांक १८/०५/२०१३, दिनांक २१/१२/२०१९, दिनांक २१/१०/२०१५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

९. नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय करगांव ता.चाळीसगांव, जि.जळगाव यांनी जातवैधता सादर न केलेल्या मागासवर्गीय कर्मचारीबाबत वरील अट क्रं. ०६ ते ०९ प्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

१०. नियुक्ती प्राधिकारी यांनी सादर केलेले कागदपत्र व पुरविलेल्या माहितीच्या आधारे बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.

११. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२९/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे रिक्त करणेबाबत सुचना पारित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

- उपसचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.२०० A/१६-ब दिनांक १९.०४.२०१८ नुसार खालील परिस्थितीत बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील.
  १. मागासवर्ग कक्षाकडुन रोस्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजुर पदसंख्येत वाढ / घट झाल्यास पदभरतीच्या वेळी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहीत मुदतीपुर्वी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घ्यावी.
  २. प्रत्येक वर्षी जर कार्यरत पदसंख्येमध्ये बदल होत असेल म्हणजेच रिक्त पदसंख्या बदलत असेल अशा वेळी दरवर्षी रोस्टर तपासुन आरक्षण निश्चीती करणे आवश्यक राहील.
  ३. पदभरतीच्या वेळी देखील बिंदुनामावली नोंदवही तपासणी करणे आवश्यक राहील.
  ४. आरक्षणाची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कार्यरत पदसंख्या बदलत असेल अशावेळी म्हणजेच दरवर्षी रोस्टर तपासणे आवश्यक राहील.
  ५. ज्यावेळी मंजुर पदसंख्या, कार्यरत पदसंख्या व रिक्त पदसंख्या यामध्ये कोणताही बदल होत नसेल अशावेळी दरवर्षी रोस्टर न तपासता दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणे उचित होईल.

  वरील परिस्थीतीत वेळचे वेळी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक



Scanned with OKEN Scanner

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (मागासवर्ग कक्ष)**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१**

Email Id - bccellnashik@gmail.com
Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

************************************************************************************

वरील परिस्थीतीत वेळचे वेळी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. **या संदर्भात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.**

बिंदु नामावली नोंदवही तपासणी मध्ये वरील संवर्गात दर्शविलेला अनुशेष शासनाने ठरवून दिलेल्या विहीत कार्यपध्दतीने व दिलेल्या मुदतीत भरावा. त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास बिनचूक सादर करणेबाबत सूचना आपले स्तरावरुन **नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय करगांव ता.चाळीसगांव, जि.जळगाव** यांना देण्यात याव्यात.

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटकया जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी अ ारक्षण) अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) अन्वये उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पदे आरक्षित ठेवणे व आरक्षणनिहाय पदे भरणे ही नियुक्ती प्राधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. सदर तरतुदींचे पालन न केल्यास संबंधिताविरुद्ध अधिनियमाच्या कलम ८ अन्वये पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.**

**(निलेश जाधव )**
**सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

**प्रत:-** माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१) मा. सचिव, सामान्य प्रशासन विभाग,कक्ष-१६ब, मावक, मंत्रालय, मुंबई-३२ सविनय सादर
२) **नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय करगांव ता.चाळीसगांव, जि.जळगाव**
३) निवड नस्ती

Scanned with OKEN Scanner